RNI MAHMAR
36829-2010

ISSN- 2229-4929

Peer Reviewed


# Akshar Wangmay

## International Research Journal


UGC-CARE LISTED

Special Issue - IX

**Interdisciplinary View on Socio-Economic, Educational, Management, Environmental, Research, Language and Sustainable Development in Covid-19 Pandemic Situation**



January 2021






**Chief Editor : Dr. Nanasaheb Suryawanshi**

**Executive Editor : Prof. Kartik R. Patil**

**Principal,**
Rashtrasant Tukdoji College, Chimur
Ta-Chimur, Dist-Chandrapur (Maharashtra)

**Co-Editor : P. M. Rajurwade**





Address
'Pranav', Rukmenagar,
Thodga Road, Ahmadpur, Dist- Latur 413515 (MS)

'Akshar Wangmay' UGC Care Listed, International Research Journal, ISSN: 2229-4929, January 2021
Special Issue, Volume-IX *"Interdisciplinary View on Socio-Economic, Educational, Management, Environmental, Research, Language and Sustainable Development in Covid-19 Pandemic Situation"*


| Page No. |
|---|
| 1-4 |
| 5-9 |
| 10-12 |
| 13-15 |
| 16-17 |
| 18-20 |
| 21-29 |
| 30-36 |
| 37-39 |
| 40-41 |
| 42-45 |
| 46-47 |
| 48-50 |
| 51-52 |
| 53-64 |
| 65-67 |
| 68-69 |
| 70-72 |
| 73-75 |
| 76-79 |
| 80-82 |
| 83-85 |
| 86-88 |
| 89-91 |

| | | |
|---|---|---|
| 25 | Making Quarantine Look Good: A Study of *WhatchaGot2Say*'s Reaction Video to "BTS during Quarantine" and Fan Engagement during the Pandemic<br>**Samprikta Pal** | 92-94 |
| 26 | Socio-Economic and Ecological Effect of Covid-19<br>**Gyanaranjan Sahoo, Afaq Majid Wani, Amita Sharma** | 95-98 |
| 27 | Agro Tourism,Potential in Pune district, Maharashtra, India.<br>**Mrs. Sunaina Ravindra Patil, Dr. Sachin J. Deore** | 99-101 |
| 28 | Digital Pedagogy: The New Normal of Teaching<br>**Dr. Rashmi Singh** | 102-104 |
| 29 | Impact of Increasing Population on Environment in Satara District<br>**Dr. Vijay A. Pawar, Mr. Sagar Maruti Shinde** | 105-108 |
| 30 | Impact of Covid-19 on the livelihood of tribals in India<br>**Dr. Devendra Bhawari** | 109-111 |
| 31 | Impact of Pandemic Covid-19 on Education in India<br>**Manohar Kumar** | 112-114 |
| 32 | Covid-19 Opportunities for Indian Coffee, Tea and Tobacco Export<br>**Dr. Mahendra B. Bagul** | 115-118 |
| 33 | A Study On Perception And Attitude Of Employees On Digitalised Organizational Culture And Its Influence On Their Behaviour With Special Reference To Paragon Steel P. Ltd.(Palakkad) India<br>**Professor M. Dhanabhakyam, Emil Joseph** | 119-122 |
| 34 | Coronavirus's Impact on Social and Culture in India<br>**Dr. Harishchandra P. Pardhi** | 123-125 |
| 35 | Impact Of Covid-19 Pandemic On The Decentralization Process Of Primary Education: A Study Of Aurangabad Region<br>**Dr. Bharat Gore** | 126-130 |
| 36 | COVID-19 Beacon of Hope for Education<br>**Dr. Shankar Ambadas Gavali** | 131-133 |
| 37 | Prem Nath Bazaz: An analytical study of his Newspaper Hamdard (1935-1947A.D)<br>**Dr Firdous Hameed Parey** | 134-137 |
| 38 | Development of Sustainable Aspect during Covid-19 Phase through a Composting project in Maharashtra, Devgad District<br>**Sensei Surendra Sawardekar** | 138-140 |
| 39 | A Study on Financial Performance of Savitribai Phule Pune University<br>**Mrs. Sonam R. More, Principal Dr. Ashok D. Wagh** | 141-145 |
| 40 | Empty Nest Period: A Study On Psychological Well Being And Marital Adjustment In Nagpur<br>**Dr. Payal Chamatkar** | 146-148 |
| 41 | कोरोना महामारीचा बिहार विधानसभा निवडणूकीवर झालेला परिणाम – एक विश्लेषणात्मक अध्ययन<br>**प्रा. डॉ. नितीन तुळशिराम कत्रोजवार** | 149-152 |
| 41 | लॉकडाऊन आणि महिलांच्या ताणतणावात वाढ<br>**प्रा. पितांबर विठोबाजी पिसे** | 153-154 |
| 42 | आदिवासींमधील कुपोषणाची सद्यस्थिती<br>**प्रा. मेघावी गोपीनाथ मेश्राम** | 155-159 |
| 43 | ग्रामपंचायतींचे उत्पन्न व खर्च यांचे चिकित्सक अध्ययन – (संदर्भ चंद्रपूर जिल्हा)<br>**राहूल एम. लभाने, डॉ.नितिन बी. कावडकर** | 160-163 |
| 44 | कोविड -19 महामारी मुळे समाज व्यवस्थेवर झालेले परिणाम आणि समाजकार्य मध्यस्थीतून झालेल्या सकारात्मक प्रयत्न<br>**डॉ .नितीन रामदास बडगुजर** | 164-166 |
| 45 | परळी तालुक्यातील साक्षरतेचा भौगोलिक अभ्यास<br>**डॉ.व्ही.एस.चिमनगुंडे, श्री. कैलास भास्कर लव्हाळे** | 167-168 |
| 46 | कोरोणाचा भारतीय शेती क्षेत्रावर झालेला परिणाम<br>**डॉ. सुरेश वसंतराव खोंड** | 169-171 |

'Akshar Wangmay' UGC Care Listed, International Research Journal, ISSN: 2229-4929, January 2021
Special Issue, Volume- IX *"Interdisciplinary View on Socio-Economic, Educational, Management, Environmental, Research, Language and Sustainable Development in Covid-19 Pandemic Situation"*

# परळी तालुक्यातील साक्षरतेचा भौगोलिक अभ्यास

**डॉ. व्ही. एस. चिमनगुंडे[1] श्री. कैलास भास्कर लव्हाळे[2]**
[1]श्री संत जनाबाई कला वाणिज्य, व विज्ञान महाविद्यालय, गंगाखेड, जि.-परभणी
[2]महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर

**सारांश:**
सदेशाच्या आर्थिक विकासात साक्षर लोकसंख्या महत्त्वाचे कार्य बजावत असते. म्हणून साक्षरतेला विकासाची जननी संबोधले जाते. अन्न,वस्त्र,निवारा,आरोग्य या मानवाच्या मूलभूत गरजा आहेत त्याच प्रमाणे शिक्षण देखील मानवाची मूलभूत गरज आहे. आजच्या युगात शिक्षण घेण्याच्या पद्धती बदलल्या आहेत. मात्र उद्देश एकसारखाच आहे. २०२० मध्ये कोरोना महामारी ने शिक्षणाची पद्धत बदलली आहे. ऑनलाईन शिक्षण पद्धती मोठ्या प्रमाणात रुजू होत आहे. म्हणून शोधनिबंधात साक्षरता या घटकाचा विचार केला आहे
**बीजसंज्ञा:** साक्षरता, मंडळ निहाय साक्षरता.

**प्रस्तावना:**

समाजाच्या विकासासाठी लेखन वाचन हे घटक महत्त्वाचे आहेत. आधुनिकीकरणाच्या दिशेने मानवाच्या प्रगतीचे साक्षरता हे महत्त्वपूर्ण कारक आहे.(डेव्हिस १९५४) साक्षरतेचा जन्मदर,जीवनस्तर,व्यवसायिक रचना , सामाजिक विकासावर प्रभाव पडतो. साक्षरतेची व्याख्या देशानुरूप बदलत असते.कोणत्याही भाषेत किंवा आपल्या मातृभाषेत लिहिता वाचता येणे म्हणजे साक्षर होय.वेस्टर बोल्सच्या मते नैसर्गिक शक्ती चे नियंत्रण आणि तिला योग्य आकार देणे व एक व्यवस्थित न्यायपूर्ण समाजाची निर्मिती करण्यासाठी इत्यादी सर्व घटकापेक्षा शिक्षण हे सर्वात जास्त शक्तिशाली आहे.पण शिक्षणाची गुणात्मक आणि संख्यात्मक वाढ होणे आवश्यक आहे.

**अभ्यास क्षेत्र:**

परळी तालुका मध्यपूर्व महाराष्ट्रात आणि बीड जिल्ह्याच्या पूर्वेस आहे-.परळी तालुका १८ ४१'33" उत्तर अक्षांश ते १९ ७'४६" उत्तर अक्षांश आणि ७६ १४'२७" पूर्व रेखांश ते ७६ ४१'४४" पूर्व रेखावृत्त दरम्यान विस्तारलेला आहे. परळी तालुक्याच्या दक्षिणपूर्व गंगाखेड तालुका तसेच पूर्वेस सोनपेठ व पाथरी तालुक्याच्या सीमा आहेत. तर परळी तालुक्याच्या दक्षिण पश्चिमेस अंबाजोगाई तर उत्तर दिशेस माजलगाव आणि पश्चिमेला धारुर तालुक्याचा सीमा आहेत. परळी तालुक्याचे एकूण क्षेत्रफळ ७३७.९९ चौ.की.मी.आहे. त्यामध्ये १०५ ग्रामीण वस्ती १ नागरी केंद्र व ५ मंडळाचा समावेश आहे.

**उद्दिष्टे :**

१} परळी तालुक्यातील एकूण साक्षरता अभ्यासणे.

२} परळी तालुक्यातील साक्षरतेचा मंडळ निहाय अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती व आधार सामग्री संकलन:**

परळी तालुक्यातील साक्षरतेचा अभ्यास करण्यासाठी दुय्यम स्वरूपाच्या आधार सामग्रीचा वापर केला आहे.दुय्यम स्वरूपाच्या आकडेवारीसाठी बीड जिल्ह्याचा जनगणना अहवाल सन २००१ व २०११ यातून माहिती संकलित केली आहे


**विषय विवेचन:**

अभ्यास क्षेत्रातील सर्वांगीण विकासासाठी लोकसंख्या साक्षर असणे गरजेचे असते. २००१ च्या जनगणनेनुसार परळी तालुक्यातील साक्षरता ५८.७४% इतकी होती. तर २०११ च्या जनगणनेनुसार परळी तालुक्याचे एकूण साक्षरता ६७.६८% इतकी आहे.त्यामुळे ग्रामीण भागातील २००१ च्या जनगणनेनुसार साक्षरता ५३.९३% इतकी होती. तर नागरी भागातील साक्षरता ६६.७२% इतकी होती.२०११ च्या जनगणनेनुसार ग्रामीण भागातील साक्षरता ६५.१८% आहे आणि नागरी भागातील साक्षरता ७३.०७% इतकी आहे.

**अभ्यास क्षेत्रातील मंडळनिहाय साक्षरता:**

| | | २००१ | | | २०११ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | महसूल मंडल | एकूण लोकसंख्या | साक्षर लोकसंख्या | साक्षरता (%) | एकूण लोकसंख्या | साक्षर लोकसंख्या | साक्षरता (%) |
| १ | सिरसाला | २१६७८ | १६७५३ | ५२.५५ | ४१३५० | २६३१९ | ६३.६५ |
| २ | पिंपळगाव | ३२३५३ | १७२१० | ५३.१९ | ४३४५१ | २८४४६ | ६५.४७ |
| ३ | नागापूर | २८८०४ | १५३९८ | ५३.४५ | ३९९४८ | २५९०० | ६४.८३ |
| ४ | परळी | ११२११३ | ७२९७२ | ६५.०४ | १२५२१५ | ८९५९३ | ७१.५५ |
| ५ | धर्मापूर | २९७५६ | १५७१८ | ५२.८२ | ३७२४४ | २४१३८ | ६४.८१ |
| | एकूण तालुके | २३४९८७ | १३८०५१ | ५८.७४ | २८७२०८ | १९४३९६ | ६७.६८ |

साधनसामग्री : बीड जिल्ह्याचा जनगणना अहवाल सन २००१ -२०११




**निष्कर्ष:**

१) देश,राज्य,जिल्हा यांच्या तुलनेत परळी तालुक्यातील साक्षरता कमी आहे

२) अभ्यास क्षेत्रातील साक्षरतेवर भौगोलिक रचनेचा परिणाम झालेला दिसून येतो.सिरसाळा मंडळात डोंगराळ प्रदेश असल्याने दळणवळणाच्या सुविधा कमी आहेत. त्यामुळे या मंडळात साक्षरता साक्षरता कमी आहे

३) सिरसाळा मंडळात बंजारा समाज मोठ्या प्रमाणात असल्याने हा समाज सतत ऊस तोडी साठी साठी भ्रमंती करत असतो त्यामुळे शिक्षणापासून वंचित आहे.

४) ग्रामीण भागातील साक्षरता नागरी भागा पेक्षा कमी आहे.

५) परळी तालुक्यात ऊसतोड मजुरांचे प्रमाण जास्त असल्याने लोकसंख्या शिक्षणापासून वंचितआहे.

**उपाययोजना:**

१) साक्षरतेचे प्रमाण वाढविण्यासाठी ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार होणे गरजेचे आहे.

२) ऊसतोड कामगारांच्या मुलांना शिक्षणासाठी साहित्य व शिक्षण मोफत केले पाहिजे.

३) सिरसाळा मंडळात शिक्षण सुविधा वर वर भर दिला पाहिजे.

४) डोंगराळ भागात दळणवळण सुविधांचा विकास झाला पाहिजे.

**संदर्भ:**

१) भारतीय जनगणना अहवाल, २००१ आणि २०११

२) ए. बी. सवदी प्रा. कोळेकर पी. एस. मानवी व लोकसंख्या भूगोल, निराली प्रकाशन, पुणे, १९९९

३) सामाजिक आणि आर्थिक समालोचन २००१

४) Ghosh B.N ' Fundamental of population Geography'

५) District Gazetrer Beed District

६) www.beedgov.in